महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महा पारेषण समाचार

वर्ष ७ वे : अंक ३

एप्रिल/मे-२०१२

## संवाद

प्रिय कर्मचारी बंधू-भगिनींनो,

सर्वप्रथम ६ जून २०१२ रोजी संपन्न झालेल्या कंपनीच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त मी तुम्हा सर्वांना शुभेच्छा देतो. त्या काळात मी जरी रजेवर होतो, तरी कंपनीच्या सर्व कार्यालयांमध्ये तो उत्साहात साजरा झाल्याचे समजले.



याप्रसंगी कंपनीच्या ध्येय, उद्दिष्ट आणि दृष्टीकडे आपणा सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. ती गाठण्यासाठी आपणा सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. या घडीला आपली कंपनी अनेक बाबतीत आघाडीवर आहे आणि ही आघाडी भविष्यातही कायम राखणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. २०१२-१३ या आर्थिक वर्षाच्या सुरूवातीला आपली कामगिरी चांगली झाली आहे. पहिल्या तिमाहीतील लक्षणीय वेळ आपण मागील वर्षाची कामगिरी तपासण्यात तसेच येत्या वर्षाचे नियोजन करण्यात खर्ची घातला आहे. ARR मंजूर करताना आपल्या नियंत्रकांनी किमतीचा/खर्चाचा विचार करण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे आपण महसूल जमा करतानाच कर्मचाऱ्यांच्या वेतनावर तसेच प्रशासकीय खर्चात कपात करायला हवी. या सर्वात महसूल हा अतिशय महत्वाचा घटक आहे कारण महसुलात घट झाल्यास प्रशासकीय खर्चाच्या टक्केवारीत वाढ होईल. त्यामुळे महसुलाशी संबंधित मुद्दे जसे की व्यवस्था उपलब्धता ठरविलेल्या मानांकनाच्या वर ठेवून नियंत्रकाकडून बोनस मिळविता येऊ शकतो. व्यवस्था उपलब्धता चोख ठेवण्यात आपण कमी पडलो तर त्याचा दंड भरावा लागू शकतो आणि त्यामुळे कंपनीला महसुली तोटा सहन करावा लागू शकतो. नव्याने निर्माण केलेल्या मालमत्तेचं वेळेत भांडवलीकरण झाल्यास महसुलात वाढ होऊ शकते.

पावसाळ्यात पारेषण यंत्रणेत बिघाड होण्याची शक्यता असल्याने महसुली तोटा होण्याचा धोका असतो. तो धोका टाळण्यासाठी आणि पावसाळ्यात पारेषण यंत्रणा सुव्यवस्थित राहावी, त्यात बिघाड होऊ नये यासाठी संचलन विभागाने सविस्तर निर्देश दिलेले आहेत. यामध्ये अति उच्च दाब पारेषण वाहिन्यांजवळची झाडे कापणे, Thorough Line Patrolling, Monkey Patrolling, अतिउच्च दाब वाहिन्या तसेच उपकेंद्रांच्या Earth Wire/Shield Wire चे मजबूतीकरण व जिथे Earth Wire आवश्यक असतील तिथे त्या पुरवणे आवश्यक आहे. सर्व MB आणि महत्त्वाच्या उपकरणांत जसे की Buchholz, PRV, WTI, OTI, Cooling Control Cabinets of TFS / ICTs यामध्ये आर्द्रतेमुळे किंवा ओलाव्यामुळे बिघाड होऊ नये यासाठी त्यांचे व्यवस्थित आच्छादन करणे गरजेचे आहे. सर्व Lightening Arrester चे Leakage Current Management तसेच Switch Yard मधील तसेच पारेषण वाहिन्यांचे Loose Connection/Joints तपासून ते योग्य पद्धतीने ठेवणे, Switch Yard तसेच वाहिन्यांच्या Thermo Scanning दरम्यान आढळलेल्या Hot Spot कडे लक्ष देणे आणि Interlock for isolators आणि Earth Switches व्यवस्थित कार्य करतात किंवा नाही याची दक्षतापूर्वक चाचणी करणे आवश्यक आहे. हे उपाय काळाच्या कसोटीवर तपासले गेले असून पारेषण यंत्रणा निर्दोष ठेवण्यासाठी आवश्यक आहेत. याशिवाय उपकेंद्रांनी पूर, पाणी साठणे, गळती यांसारखे धोके लक्षात घेऊन उपाय योजावेत.

हा पावसाळा आपली सहनशक्ती आणि संकटांना तोंड देण्याची आपली तयारी यांची परीक्षा पाहणारा आहे. वर्षभर अशाच पद्धतीने आपण संकटांना तोंड देण्यास तयार राहिलं पाहिजे. मला आशा आहे की आपण अशी परिपूर्ण तयारी केली तर ग्रीडमध्ये यंत्रणेत कुठेही बिघाड होणार नाही.

रजेवर असताना अलीकडेच घडलेल्या Bus Bar Operations च्या बातम्या ऐकून मी अस्वस्थ झालो. वारंवार सूचना देऊन आणि उपकेंद्रांमध्ये वेळोवेळी संचलन व सुव्यवस्थापनाचे उपक्रम राबवूनही असे का घडते याची कारणे समजत नाहीत. अशा बिघाडामुळे संचालनातील कार्यक्षमता खालावते आणि त्याच्या परिणाम संस्थेच्या एकंदर कामगिरीवर होत असतो. यापुढे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत आणि दुरूस्ती करण्यात टाळाटाळ करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. तुमच्यापैकी प्रत्येकाने खर्चाचा विचार करून संस्थेचे नुकसान होणार नाही याकडे लक्ष द्यावे अशी माझी आपणा सर्वांना विनंती आहे. संस्थेचा मौल्यवान वेळ आणि संसाधन Damage Control वर खर्च व्हावेत असं मला अजिबात वाटत नाही त्यामुळे उपकेंद्रांमध्ये पारेषण यंत्रणा नियंत्रित करणाऱ्या अभियंत्यांनी अधिक सजग आणि कामा प्रती बांधिल राहायला हवं.

हा पावसाळा आपल्यासाठी संपन्नता घेऊन येवो आणि योग्य दक्षतेद्वारे कुठेही काही अनुचित घटना न घडो अशी आशा करतो. जर कुणाला काही अधिक माहिती किंवा मार्गदर्शन हवे असेल तर त्यांनी संबंधित वरिष्ठांच्या ते निदर्शनाला आणावं. याबाबतीत मी तुम्हाला पूर्ण सहकार्य आणि पाठिंब्याचं आश्वासन देतो.

सदिच्छांसह .....

**अरविंद सिंह**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

Dear Colleague,

At the outset, let me also participate in the joyous moment of 7th foundation day celebration of our company on 06th June '2012 and give my best wishes to you on this occasion. Though I was on leave during that period, I remembered the auspicious day and learnt that it was celebrated well at all our offices.

On this occasion, I take this opportunity to reassert our vision, mission and objectives of the organization. We must progress to achieve these with target orientation and focused attention. At present our organization is leading on many fronts and it is our responsibility that we must continue leading in the future as well. We started with good performance in the beginning of the new financial year 2012-2013. We have spent considerable time of first quarter on review of our last year performance and performance planning for the current year. While sanctioning our ARR, our regulators have advised us to be cost conscious; particularly regarding employee costs and administrative expenses. Therefore it is essential that we must not lose sight of on our revenue collection and take steps to bring down administrative costs. Revenue is the key in this aspect as any decrease in the revenue will increase the percentage share of administrative expenses. Therefore we must keep eye on revenue related aspects such as keeping system availability above the standard specified with an aim to gain bonus from the regulator, failing to maintain system availability shall attract penalty and result in revenue loss to the company. Timely capitalization of assets that have been recently constructed will also add to the revenue flow.

The risk of revenue loss is more in monsoon period as during this time our transmission system is vulnerable to breakdown. Therefore the Operations Department has issued detailed directives in this regard so that we keep our system full-proof to avoid unwarranted tripping and interruptions during monsoon. These directives are thorough line patrolling, tree cutting along the EHV lines, monkey patrolling, strengthening of earth wire/ shield wire of EHV lines and substations and providing earth wire in missing spans. Further, all the MBs and vital instruments such as (Buchholz, PRV, WTI, OTI, cooling control cabinets of TFs/ ICTs etc.) should be properly covered to avoid ingress of water/ moisture, proper leakage current measurement of all LAs, to ensure proper tightening of loose connections/ joints in the switch yard and on the lines, attending hot spots detected in thermo scanning of switch yard/ lines and ensuring availability of proper mechanical interlock for isolators and earth switches. These measures are time tested and shall full-proof our transmission system. Besides, the field has to take specific precaution considering their specific vulnerability for flood, water logging, leakages or seepages etc.

The monsoon period is a testing time of our endurance and preparedness. Such preparedness shall be useful throughout the year. With such exhaustive preparation, I hope I shall not see any system failure in the Grid.

On hearing recent news of bus bar operations while I was on leave, I was perturbed. In spite of our repetitive instructions in respect of our routine operational and maintenance activities to be carried out at the field, I fail to understand its reasons. Such failure brings down our operational efficiency and affects overall performance of the organization. It shall not be tolerated anymore and strict action will be taken on those who fail to carry out remedial work. I urge each one of you to become cost conscious and prevent losses to the organization. I do not want to spend organization's precious time and resources on damage control and therefore request field engineers who control the system to be more vigilant and duty bound.

I hope this monsoon brings prosperity for us and with proper preparedness there shall be no adversity reported due to the monsoon. One need any additional resources or guidance, I urge to bring it to the notice of the concerned Supervisors. I assure you our full co-operation and support in this regard.

With Best Wishes !!

**Arvind Singh**

Chairman and Managing Director

## चाचणी व संचारण प्रविभाग नागपूरतर्फे एकदिवसीय कार्यशाळा



चाचणी व संचारण प्रविभाग नागपूर यांच्या वतीने "Instrument transformers :Its construction, principle & maintenance" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. दि. १७ एप्रिल २०१२ रोजी कॉन्फरन्स हॉल, विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यशाळा श्री.कोंडावार, अधीक्षक अभियंता, चाचणी व संचारण प्रविभाग, नागपूर, यांच्या अध्यक्षते खाली आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचा शुभारंभ माननीय श्री. सुभाष केळकर, मुख्य अभियंता, नागपूर परिमंडळ यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या कार्यशाळेला श्री. तेलतुंबडे, अधीक्षक अभियंता, प्रविभाग चंद्रपूर व श्री.गुरूलवार, अधीक्षक अभियंता, प्रविभाग नागपूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. ए.के. मजुमदार प्रो.प्रा. न्यू इंडिया एन्टरप्रायझेस नागपूर यांनी उपस्थित ६० अभियंत्यांना वरील नमूद विषयावर मार्गदर्शन केले. तसेच कार्यशाळेत उपस्थित अभियंत्यांना संबंधित विषयाचे Study Material उपलब्ध करून देण्यात आले. तसेच श्री. केळकर, मुख्य अभियंता, नागपूर परिमंडळ व श्री. कोंडावार, अधीक्षक अभियंता, चाचणी व संचारण प्रविभाग, नागपूर यांनी उपस्थित अभियंत्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

उपस्थित अभियंत्यांकडून कार्यशाळेबाबत लेखी प्रतिसाद नोंदवून घेण्यात आला व त्यांनी सदर कार्यशाळा उत्तम झाल्याचा अभिप्राय नोंदवला. अशा प्रकारची कार्यशाळा इतर विद्युत उपकरणावर (Power transformer, breaker इत्यादी) देखील आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

सदर कार्यशाळा यशस्वी करण्याकरिता श्री. नांदापूरकर, उपकार्यकारी अभियंता, श्री. पाटील, उपकार्यकारी अभियंता, श्री. राय उपकार्यकारी अभियंता, कु. नारनवरे, सहाय्यक अभियंता, श्री. मंगरूळकर, श्री. मांडवेकर, श्री. कछवाहा श्री. देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महापारेषण कंपनीचा स्टरलाईट टेक्नॉलॉजिज लिमिटेडसोबत करार



महापारेषण कंपनीतर्फे OPGW (Optic Power Ground Wire) केबल वापरून संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक संपर्क जाळे (Comprehensive Communication Network) उभारण्याकरिता मे. स्टरलाईट टेक्नॉलॉजिज लिमिटेडशी २० वर्षाकरिता करार करण्यात आला. ४ मे २०१२ रोजी महापारेषणचे सांघिक कार्यालय प्रकाशगंगा येथे या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह, श्री. उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन), श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प), श्री. प्रतापराव मोहिते, संचालक (वित्त), श्री. सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन), श्री. विजय लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प), श्री. आर. सुरेश, मुख्य अभियंता (सं.व.सु.) तसेच मे. स्टरलाईट टेक्नॉलॉजिजचे विजय जैन, सीओओ (नेटवर्क बिझनेस) उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अस्तित्वात आल्यापासून Communication व Data Transfer साठी PLCC ही प्रणाली अस्तित्वात आहे. या प्रणालीवर या IEC-101 प्रोटोकॉलवर Data Transfer करता येतो. नव्या प्रणालीत R.T.U. ची माहिती IEC 104 या प्रोटोकॉलवर पाठवायची असल्याने ती माहिती सध्या अस्तित्वात असलेल्या PLCC प्रणालीवर पाठविणे शक्य नाही. त्यामुळे महापारेषण कंपनीने Fibre Optics वर आधारित सर्वसमावेशकर जाळे उभारण्याचे ठरविले. महापारेषण कंपनीत दि. ३१ मार्च २०१२ रोजी उपकेंद्रांची संख्या ५५९ असून पारेषण वाहिन्या ३९८७१ सर्किट किमी आहेत. त्यापैकी फक्त २८०१ किमी पारेषण वाहिन्यांवर OPGW Cable टाकण्यात येईल.

मे. स्टरलाईट टेक्नॉलॉजिज लिमिटेडसोबत संयुक्त उपक्रम कंपनीच्या सहभागाने (Joint Venture Partnership) १६५ कोटी रूपये खर्चाचे सर्वसमावेशक संपर्क जाळे उभारण्यास शासनाने मान्यता दिल्यानंतर करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. सदर प्रकल्प १५ ते १८ महिन्यांत पूर्ण होईल.

महापारेषण कंपनीला ४८ Fibre पैकी ८ Fibre सोबत संपर्कासाठी आवश्यक उपकरणे (SDH & MUX) मोफत मिळतील. त्यामुळे सर्वसमावेशक संपर्क जाळे स्थापित करण्यास मदत होईल. उरलेल्या ४० Fibre चा वापर JV कंपनी व्यापारी तत्वावर करून उत्पन्न मिळवेल. महापारेषण कंपनीला वार्षिक उत्पन्नातील ५ टक्के महसूल मिळेल. तसेच ४९ टक्के Equity वर लाभांशाच्या (Dividend) रूपात महसूल मिळेल. २० वर्षांनंतर JV संपल्यानंतर सर्व पायाभूत सुविधा महापारेषणला हस्तांतरित होतील.

## राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली तर्फे कोल्हापूर येथे ऑनलाईन माहिती पुरवण्याच्या पद्धतीचे सादरीकरण

राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली तर्फे दि. १२ मे रोजी कोल्हापूर येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी वीज निर्मिती केंद्रांनी दूरसंचार संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन माहिती पुरविण्याच्या पद्धतीचे सादरीकरण करण्यात आले.

विद्युत कायदा २००३ अन्वये वीज निर्मितीच्या परवान्याच्या आवश्यकतेचे सादरीकरण झाल्याने अनेक छोटेमोठे उद्योग या क्षेत्रात कार्यरत झाले आहेत. अनेक साखर कारखान्यांनी छोट्या मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती सुरू केली आहे. सौर ऊर्जेसारख्या अपारंपरिक स्त्रोतांचा वापर करूनही वीज निर्मिती केली जात आहे.

वीजप्रणालीच्या निगराणी व नियंत्रणाची जबाबदारी राज्य भार प्रेषण केंद्राची आहे. ही जबाबदारी योग्यतेने पार पाडण्याकरिता वीजप्रणालीचा वापर करणाऱ्या सर्व उपभोक्त्यांच्या वीजप्रणालीची ऑनलाईन माहिती राज्य भार प्रेषण केंद्रास मिळणे आवश्यक आहे. तथापि, छोटया वीज केंद्रास याबाबत योग्य माहिती नसल्याने अशी माहिती पुरविण्यात अडचण येत होती. वीजनिर्मिती सुरू करताना विद्युत मांडणी पारेषण जाळयास जोडण्यास राज्य भार प्रेषण केंद्राची परवानगी घेताना तीन महिन्यांत ऑनलाईन माहिती पुरवू असे अभिवचन घेऊन निर्मितीस परवानगी देण्यात येत होती.

पश्चिम क्षेत्रीय भार प्रेषण केंद्राने याबाबत केंद्रीय वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल केली आहे. त्याची दखल घेऊन राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीचे श्री. सुरेश पाटील, अधिक्षक अभियंता (संगणक प्रणाली) यांनी पुढाकर घेऊन स्नायडर इंडिया व स्ट्रेटो लिमिटेड यांचे विद्यमाने कोल्हापूर येथे दि. १२ मे २०१२ रोजी आयोजित केलेल्या चर्चासत्रामध्ये भाग घेतला त्यावेळी श्री. पाटील यांनी राज्य भार प्रेषण केंद्राची जबाबदारी, कामकाज व वीजप्रणाली उपभोक्त्यांची जबाबदारी व सहकार्याने होऊ शकणारी उत्कृष्ट सेवाप्रणाली व सामाजिक बांधिलकी यावर उत्कृष्ट मार्गदर्शन केले. तसेच उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. याप्रसंगी श्री. पी.एन. काळे, उप कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

सदर चर्चासत्रात स्नायडर इंडिया व स्ट्रेटो लिमिटेड यांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशिवाय सुमारे चाळीस वीजनिर्मिती केंद्रांचे मुख्य अभियंता व संचालक उपस्थित होते व जवळजवळ शंभर प्रतिनिधींची उपस्थिती होती. योग्य माहिती मिळाल्याबाबत सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले व उपक्रमाची प्रशंसा करण्यात आली. अशा चर्चासत्रांसाठी राज्यातील इतर ठिकाणांहून निमंत्रण येत असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.

## कार्यकारी संचालक (संचलन) या पदावर श्री. सुभाष केळकर रुजू



महापारेषण कंपनीच्या कार्यकारी संचालक (संचलन) या पदावर श्री. सुभाष केळकर यांची निवड झाली आहे. श्री. सुभाष केळकर यांनी २३ एप्रिलला कंपनीच्या सांघिक कार्यालयात पदभार स्वीकारला.

श्री. केळकर या आधी कंपनीच्या नागपूर परिमंडळात मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. मुख्य अभियंता म्हणून काम करत असताना श्री. केळकर यांनी नागपूर येथे अनेक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले तसेच विविध उपक्रमही राबविले.

श्री. केळकर यांनी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातून कनिष्ठ अभियंता म्हणून आपल्या सेवेला सुरूवात केली. या आधी त्यांनी राज्य भार प्रेषण केंद्र कळवा येथे तसेच कंपनीच्या सांघिक कार्यालयात विविध महत्त्वाच्या पदांवर आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. श्री. केळकर यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## श्री. उमाकांत कावळे, मुख्य अभियंता (स्थापत्य) सांघिक कार्यालयात पदोन्नतीवर रूजू



महापारेषण मध्ये पारेषण प्रकल्प विभागामार्फत उपकेंद्राच्या जमीन अधिग्रहण, नियंत्रक उभारणी, उपकरण व परिवर्तित पाया कामे व संचलन विभागामार्फत देखभाल इत्यादी महत्त्वाच्या कामांकरिता मुख्य अभियंता (स्थापत्य) पदाची मागणी होती, महापारेषण कंपनीच्या व्यवस्थापनामार्फत मुख्य अभियंता (स्थापत्य) या पदाची निर्मिती करण्यात आली.

श्री. उमाकांत कावळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), अउदा स्थापत्य बांधकाम मंडळ, नाशिक येथे कार्यरत होते. त्यांची मुख्य अभियंता (स्थापत्य) या पदावर मे २०१२ मध्ये निवड करण्यात आली. श्री. उमाकांत कावळे हे मुख्य अभियंता (स्थापत्य) या पदावर दिनांक २१/०५/२०१२ रोजी महापारेषण सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा, मुंबई येथे रूजू झाले.

श्री. उमाकांत कावळे यांनी पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मध्ये सन १९८१ मध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर सेवेस सुरूवात केली. त्यांना ३१ वर्षांचा वीजनिर्मिती प्रकल्प, पारेषण उपकेंद्र उभारणी व देखभाल या कामाचा अनुभव आहे. या अनुभवाचा महापारेषण कंपनीस प्रकल्प खर्च कमी करणे व वेळेत पूर्ण करणे यासाठी उपयोग होणार आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

## मानव संसाधन विभागातील अधिकाऱ्यांसाठी Noting and Drafting विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

मानव संसाधन विभागातर्फे अउदा उपकेंद्र पडघे येथे Noting and Drafting या विषयावर दि. २५ मे रोजी कार्यशाळेचं आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत सात परिमंडळातील सुमारे २२ अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेत प्रशिक्षक श्री. अन्थोनी डिसूझा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी श्री. सुभाष सोने, प्रभारी कार्यकारी संचालक (मासं), श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मासं), श्री. भाऊराव राऊत मुख्य अभियंता (मासं व मुख्य तपासणी अधिकारी) उपस्थित होते.

मानव संसाधन विभागात काम करीत असताना गेले अनेक दिवस Noting and Drafting या विषयावर कार्यशाळा घेण्याची मागणी होती असे सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री. मंगेश शिंदे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

सकाळी १० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत चाललेल्या कार्यशाळेत श्री. डिसूझा यांनी Noting and Drafting या विषयावर अतिशय मोलाची माहिती दिली.

कार्यशाळेदरम्यान श्री. सोने साहेबांनी प्रसंगानुरूप आपल्या प्रदीर्घ सेवेतील अनुभव तसेच Noting and Drafting विषयाची मूलभूत तत्त्वे सांगितली. या कार्यशाळेमुळं Noting and Drafting मध्ये सुधारणा होण्यास खूप मदत होईल अशी भावना सातही परिमंडळातील उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल, कराड येथे अग्निशमन सप्ताह साजरा

अउदा बांधकाम नि संवसु परिमंडल, कराड येथे दि. १४ ते २० एप्रिल २०१२ या कालावधीत उत्स्फूर्तपणे अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अग्निशमन सेवा सप्ताहादरम्यान अग्निशमनसंबंधी जागरूकता वाढवण्यासाठी सर्व उपविभाग व उपकेंद्रांमध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाने दिलेले अग्निशमन संबंधी घोषवाक्यांचे पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात आले. तसेच सर्व उपविभाग व उपकेंद्रांमध्ये अग्नि आदेशांची ओळख, अग्निशमन सयंत्राचा वापर, आगीपासून निर्माण होणारे धोके टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता व त्यावरील उपाययोजना याबाबतचे प्रशिक्षण देऊन मॉकड्रील घेण्यात आले.

अउदा संवसु विभाग, सांगली अंतर्गत येणा-या सर्व उपकेंद्रातील उपकेंद्रप्रमुख व कर्मचारी यांना उपविभाग विश्रामबाग येथे बोलावून सर्व प्रकारच्या अग्निशमन सयंत्राची माहिती तसेच प्रशिक्षण देण्यात आले. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. दुधाळ यांनी उपस्थित उपकेंद्रप्रमुख व कर्मचा-यांना मार्गदर्शन केले. तसेच सर्व उपकेंद्राना नायट्रोजन इंजेक्शन अग्निशमन सयंत्राबाबत माहिती देण्यात आली.

## डोंबिवली विभागात अग्निशमन सेवा सप्ताह उत्साहात साजरा



डोंबिवली विभागातील १०० केव्ही शहापूर व २२० केव्ही वाशाळा उपकेंद्र येथे १० ते १७ एप्रिल दरम्यान अग्निशमन सेवा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

शहापूर उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केली होती. कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनीही यात सहभाग घेतला. विजयी कर्मचा-यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

वाशाळा उपकेंद्रात अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यातील घोषवाक्ये खालीलप्रमाणे होती.

१. NO FIRE, NO F.I.R.

२. आगीची भूक किती ? फस्त करी सारी संपत्ती  
वेळीच टाळू आपत्ती तेव्हा होईल प्रगती

३. अग्निशमन उपकरणाचे करू या व्यवस्थापन  
वेळीच दखल घेतल्याने होते संपत्तीचे जतन

उत्कृष्ट घोषवाक्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली. सदर उपक्रमाला कार्यकारी अभियंता श्री.जी.एम.शेळके, उप कार्यकारी अभियंता श्री. एन.ए.सोरटे व वाशाळा उपकेंद्रप्रमुख श्री. एस.बी.पेटकर यांनी सहकार्य केले.

## इलेक्ट्रिकल इंडिया मासिकात भरत गवळी यांचा शोधनिबंध प्रसिद्ध



महापारेषण कंपनीत नाशिक येथे कार्यरत असलेले भरत गवळी यांचा शोधनिबंध इलेक्ट्रिकल इंडिया या नामांकित मासिकात प्रसिद्ध झाला आहे. श्री. भरत गवळी हे नाशिक येथील चाचणी विभागात कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी लिहिलेल्या “Parallel Operation of High Tension Consumers, A Case Study” या शोधनिबंधाला “इलेक्ट्रिकल इंडिया” मासिकाच्या मार्च महिन्याच्या अंकात प्रसिद्धी मिळाली आहे.

श्री. गवळी यांनी पुण्यातील भारती विद्यापीठ, धनकवडी परिसरातील दोन रोहित्रांचे समांतर संचालन (Parallel Operation ) केले. त्यामध्ये भार गुणक (Load Factor) ०.७५ पेक्षा जास्त राहिल्याने वीजेची बचत झालीच, शिवाय महावितरणकडून वीज बिलात सूट मिळाली आणि कार्यक्षमतेत वाढ झाली. श्री. गवळी यांच्या संशोधनाचे औद्योगिक क्षेत्राकडून स्वागत होते आहे.

## कराड येथे पहिल्या आंतर-कंपनी क्रीडास्पर्धा खेळाडूंची निवड चाचणी संपन्न.



कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे आयोजित पहिल्या आंतर-कंपनी क्रिडास्पर्धेसाठी व्हॉलीबॉल व कबड्डी या खेळांचे निवड चाचणी शिबीर, म.रा.वि.मं. कर्मचारी वसाहत, विजयनगर, कराड येथे दि. १२ एप्रिल २०१२ ते दि. १८ एप्रिल २०१२ या कालावधीत श्री.जी.टी.मुंडे, मुख्य अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरास या वसाहतीतील कर्मचारी प्रतिनिधींनी मोलाचे सहकार्य केल्याचे मनोगत सर्व खेळाडूंनी व्यक्त केले. या शिबिरादरम्यान देण्यात आलेल्या सुविधा तसेच राहण्याच्या सोयीची सर्व खेळाडूंनी प्रशंसा केली. कराड परिमंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आंतर-कंपनी स्पर्धेसाठी सर्व खेळांडूना शुभेच्छा देऊन निरोप दिला.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

महापारेषण कंपनीचे सांघिक कार्यालय प्रकाशगंगा येथे १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी श्री. उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन), विधि सल्लागार के. वाय. जगताप, कंपनी सेक्रेटरी डॉ. ज्योती अरोरा यांच्यासह अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आपले विचार मांडले. समाजातील विषमता संपविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले आयुष्य वेचले. भारतीय घटनेच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतुलनीय आहे. आपण सर्वांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे असे श्री. सिंह म्हणाले. यावेळी श्री. उत्तमराव झाल्टे यांनीही आपले विचार मांडले. बुद्धवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी

महापारेषणाचे सांघिक कार्यालय प्रकाशगंगा येथे दि. २४ एप्रिल रोजी (अक्षय्यतृतीया) महात्मा बसवेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन), श्री. प्रताप मोहिते, संचालक (वित्त), श्री. सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन), श्री. विजय लाटे, कार्यकारी संचालक (प्रकल्प), कंपनी सेक्रेटरी डॉ. ज्योति अरोरा यांच्यासह अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

श्री. सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन) यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. समाजातील जातिभेद मिटवण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी तरूण वयात घेतलेल्या परिश्रमांचा आढावा घेतला. उप कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र वाकळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## महापारेषणच्या सांघिक कार्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

महापारेषणचे सांघिक कार्यालय प्रकाशगंगा येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी श्री. उत्तमराव झाल्टे, संचालक (संचलन), श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प), श्री. प्रताप मोहिते, संचालक (वित्त), श्री. सुभाष सोने, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) व प्रभारी कार्यकारी संचालक (मासं) यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## गौरव — माधुरी रमेश गायकवाडची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत माधुरी रमेश गायकवाड हिने घवघवीत यश संपादन केले आहे. २२० के.व्ही. उपकेंद्र जी. सी. आर. एकलहरे, नाशिक येथे वरिष्ठ यंत्रचालक पदावर कार्यरत असलेल्या रमेश दयाराम गायकवाड यांची माधुरी ही कन्या आहे

माधुरी सध्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे एम.एस्सी ॲग्रोच्या अंतिम वर्षात शिकत आहे. माधुरीला श्री. आर. आर. अहिरे कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग नाशिक यांचे तसेच आई - वडील व प्राध्यापक वर्गाचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन लाभले.

# निरोपाचा संदेश

३७ वर्षे सेवा करण्याची संधी मिळाल्यानंतर मी ३० जून २०१२ रोजी सेवानिवृत्त होत आहे. मागे वळून पाहताना मी माझ्या कार्यकाळाबद्दल समाधानी आहे. संस्थेशी माझे वैयक्तिक तसेच व्यवसायिक संबंध फलदायी ठरलेत. या ३७ वर्षांच्या काळात मी खूप काही शिकलो आणि शिकण्याची प्रक्रिया आजही सुरू आहे. याआधी मराविमं असताना आणि त्यानंतर कंपनीची स्थापना झाल्यावरही अनेक नामवंत व्यक्तींसोबत काम करण्याची संधी मिळाल्यानं मी स्वत:ला भाग्यवान समजतो. विद्युत मंडळाचं त्रिभाजन आणि पुनर्नियोजन करण्यात मी माझं योगदान दिलं. ही जबाबदारी नवीन, आव्हानात्मक आणि मोठा परिणाम करणारी होती. मला मिळालेल्या वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळे तसेच सहकाऱ्यांच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले.



मला जर मार्गदर्शन आणि पाठिंबा मिळाला नसता तर मी हे करूच शकलो नसतो. माझा अनुभव असा आहे, जेव्हा तुम्ही निश्चयी असता आणि कष्ट करण्याची तुमची तयारी असते, तेव्हा तुम्ही एकटे नसता, तुमची संस्था तुमच्या पाठिशी असते. तेव्हांच मला कार्यक्षम आणि परिणामकारक यातील फरक समजला. आंतर बाह्य बदल होत असताना कंपनीने कसोटीचा काळ अनुभवला. हे बदल स्वीकारणे एवढ्या मोठ्या संस्थेसाठी सोपी गोष्ट नव्हती. अनेकांना ते कठीण वाटले आणि असं वाटणाऱ्यांना अपयशी होताना पाहिलं. मला इथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे की, बदलत्या व्यावसायिक वातावरणात MSETCL यशस्वी ठरत आहे.

६ जून २०१२ रोजी आपण आपल्या कंपनीचा सातवा वर्धापनदिन साजरा केला. त्यादिवशी माझ्या सहकाऱ्यांचा उत्साह सुखावणारा होता. त्या सोहळ्यातील तरूण अभियंते आणि मॅनेजर यांची भाषणं चांगली होती. मला खरंच असं वाटलं की नवी पिढी, ज्यांची भरती आम्ही केली ती भविष्यात कंपनीचं नेतृत्व करण्यास सक्षम आहे.

मला तरूण पिढीत, चमक, धाडस, महत्त्वाकांक्षा व एकता हे गुण दिसले. संस्था भविष्यातही अशीच चांगली कामगिरी करेल असा मला विश्वास वाटतो. महापारेषण समचारसाठी हा माझा शेवटचा लेख आहे. मला असं वाटतं की सर्वांकरीता आपले विचार पोहोचविण्यासाठी हे एक चांगलं माध्यम आहे. हे वाचताना तुम्हाला आनंद वाटला असेल अशी मला आशा वाटते. मला मिळालेल्या मार्गदर्शनासाठी आणि पाठिंब्यासाठी मी सर्वांचे आभार मानतो. त्यासाठी मी आयुष्यभर सर्वांचा ऋणी राहीन. भविष्यात माझी काही मदत हवी असेल तर माझ्याशी जरूर संपर्क साधा. माझ्याकडून माझ्या नकळत कुणी दुखावले असल्यास त्यांची क्षमा मागतो.

आपल्या सर्वांच्या उज्ज्वल भविष्याकरिता शुभेच्छा देऊन मी आपणा सर्वांचा निरोप घेतो.

*From the Desk of CGM (HR)*

(मराठी अनुवाद)

## Adieu

After having opportunity to render my services for continuous 37 years, I now retire on 30-06-2012. I look back and feel satisfied about my tenure in the organization. My association with the organization was fruitful for me individually and professionally. I must say that organization has well taken care of me. I learnt a lot during this time and even today I am learning. I was fortunate that I got opportunity to work with distinguished personalities, earlier when it was Board and thereafter in the Company. I had my contribution in trifurcation/ re-organization of the board. The assignments were new, challenging and having a large impact. I was guided well by my superiors and at the same time got adequate support from my subordinate staff.

On introspection, I feel I would not have performed, had I not got support and guidance. I experience in our organization that when you are determined and ready to take focused effort the organization supports you and you are never left alone. I learnt the difference between being efficient and effective. The organization faces turbulent time as it has to adapt to the internal and external changes. To cope up with the change is not easy for such a big and wide spread organization. Many finds it difficult and have seen them failing. However I must say that we at MSETCL, have been successful in facing changing business environment.

On 06th June '2012, we celebrated 7th foundation day of our Company. I am touched to see the enthusiasm and joy of my staff on that day. In that celebration the talk of young engineer and manager were mind blowing. I really felt that new generation whom we recruited is capable enough to be future leaders of the organization.

I saw spark, courage, ambition and a spirit of oneness among the young talent. I am confident that the organization shall sustain its good performance in future as well. This is my last contribution in this series which I started with "Mahapareshan Samachar". I believed that it is a good medium to reach to a large base. I hope you enjoyed reading. I like to bid an adieu which means a Goodbye to you and thank you for all your support and guidance extended to me. I shall remain oblige throughout my life. In case I am any help to you in future, do feel free to contact me. Inadvertently, if I hurt anyone in my personal and official capacity, I beg your pardon.

Goodbye and best wishes for future!!!

*From the Desk of CGM (HR)*

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

**संपादक : श्री. सचिन ढवण, जनसंपर्क अधिकारी**
E-mail : prohr@mahatransco.in
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, इ ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणसाठी)